# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २९ नोव्हेंबर २०२२

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९७/२०२२ भादंविसक १०९, मजुकाक १२(अ) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २९/११/२०२२ रोजी १२.१० वा चे सुमारास, मजरेवाडी रोड एम आर एफ टायरचे समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २९/११/२०२२ रोजी १४.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोकॉ/ १०७५ भारत महादेव पाटील, नेम- गुन्हे शाखा, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) महेश सदाशिव तागमोगे, वय- ३५ वर्षे, रा. मजरेवाडी, ताकमोगे वस्ती, सोलापूर, २) राहुल जाधव, रा. निर्मीती विहार, विजापूर रोड, सोलापूर |
| **मिळाला माल** | : | ८४५/- रु रोख रककम व जुगार साहित्य |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत क्रं. १ हा रस्त्यावरुन येणारे जाणारे लोकांकडुन पैसे घेवून त्या पैशांवर अंक व आकडयावर पैज लावून बेकायदेशीर मटका जुगार खेळवत सार्वजणिक ठिकाणी लोकांना उपद्रव करताना मिळुन आला व त्यास आरोपीत क्रं. २ यांनी प्रोत्साहन दिले आहे म्हणून. तपास:- मपोह ९५२ गायकवाड |

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९८/२०२२ भादंविसक ४९८(अ), ३२३ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/०८/२०२२ रोजी दुपारी १२.३० वा चे सुमारास, अशोक नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २९/११/२०२२ रोजी १७.०१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | लक्ष्मीबाई काशीनाथ कासे, वय- ३६ वर्षे, रा. अशोक नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दिपक बनसोडे, रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादीचे पती नागनाथ कासे यांचे २२ वर्षांपुर्वी निधन झाले आहे. फिर्यादीचे गल्लीत राहणारे दिपक बनसोडे(वरील आरोपीत) हे फिर्यादीच्या ओळखीचे आहेत. फिर्यादी व आरोपीत हे एकत्र काम करत असुन त्यांचे प्रेमसंबंध असुन १ वर्षांपुर्वी वरील आरोपीताने फिर्यादीचे गळयात मंगळसुत्र बांधुन दोघांनी लग्न केले आहे. याची माहिती फिर्यादीची मुले, आई व भावाची पत्नी यांना माहित आहे.<br>वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या घरी एकटी असताना वरील आरोपीत हा फिर्यादीचे घरी येवून फिर्यादीस आपल्या कामाच्या ठिकाणी तु लोकांना काय सांगुन आमच्यात भांडणे लावतेस असे म्हणून फिर्यादी सोबत भांडण करु लागला. तु माझे कोण नाही लागत तुझे माझ यासोबत राहायची लायकी नाही असे म्हणून फिर्यादीस अर्वाच्च शिवीगाळ करुन तु मर असे म्हणून फिर्यादीचे घरात वरील आरोपीताने जनरेटरसाठी आणुन ठेवलेले पेट्रोल व डिझेल अशी मिक्स असलेले बाटली मधुन पेट्रोल डिझेल फिर्यादीचे अंगावर ओतुन तु मर असे म्हणू लागला. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीतास मरणाची भिती दाखवतो का मी मरतेच असे म्हणून आगपेटीतील काडीने स्वत:ला पेटवुन घेतले. फिर्यादीने आरडा ओरडा सुरु केला तेव्हा फिर्यादीची आई व आजुबाजुचे लोक जमा झाले. दिपक(वरील आरोपीत) याने घरातील गादीने फिर्यादीची आग विझविली असुन फिर्यादीच्या मुलाने फिर्यादीस सिव्हील हॉस्पीटल येथे उपचारास दाखल केले आहे. तरी यातील वरील आरोपीताने फिर्यादीचे घरी येवून फिर्यादीचे अंगावर डिझेल पेट्रोल असे मिक्स बाटलीतुन फिर्यादीचे अंगावर डिझेल पेट्रोल ओतुन तु मर मला काही फरक पडत नाही असे म्हणून फिर्यादीस उकसावलेने फिर्यादी स्वत: काडी पेटीने फिर्यादीच्या अंगास पेटवुन घेतले आहे म्हणून. तपास:- सपोनि/ देशमुख - ८४४६७८५०५३ |